जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

प्रेसनोट दिनांक - ११/०८/२०२३

# सार्वजनिक गणेशोत्सव सन-२०२३ चे नियोजना बाबत

आगामी गणेशोत्सव- २०२३ नियोजनाच्या पार्श्वभुमीवर काल दिनांक १०.०८.२०२३ रोजी सायंकाळी ०६/०० वा. ते ०९/०० वा.चे दरम्यान पुणे पोलिस आयुक्तालयाच्या वतीने परिमंडळ १ मधील सर्व गणेश मंडळाची व त्यांच्या पदाधिकाऱ्यांची मिटिंग दुर्वांकुर सभागृह टिळक रोड,पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

मिटिंगसाठी परिमंडळ १ मधील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. मिटिंग दरम्यान गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी गणशोत्सवा दरम्यान त्यांना येणाऱ्या अडीअडचणीबाबत सुचना मांडल्या.

मिटिंग दरम्यान मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.संदिपसिंह गिल, पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा,श्री. विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, श्री.आर.राजा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मिटिंगच्या शेवटी पुणे शहराचे पोलीस सह आयुक्त, श्री.संदिप कर्णिक, यांनी उपस्थितांना सुचना वजा मार्गदर्शन केले व येणारा गणेशोत्सव चांगल्या व उत्साही वातावरणात पार पाडण्याचे आवाहन केले.

सदर मिटिंग ही मा.पोलिस सह आयुक्त,श्री.संदिप कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, श्री.प्रविण पाटील, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०१, श्री.संदिपसिंह गिल, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा,श्री.विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा,पुणे, श्री.आर.राजा, सहा.पोलिस आयुक्त, विश्रामबाग विभाग श्री.वसंत कुवर, सहा पोलिस आयुक्त,फरासखाना विभाग,पुणे शहर,श्री.अशोक धुमाळ, सहा.पोलिस आयुक्त,गुन्हे-०१,पुणे शहर,श्री.सुनिल तांबे, सहा.पोलिस आयुक्त,गुन्हे-०२,पुणे शहर,श्री.सतिश गोवेकर, सहा पोलिस आयुक्त,वाहतुक शाखा,पुणे शहर,श्री.सैय्यद, वरिष्ठ पोलिस निरीक्षक,विश्रामबाग,पुणे शहर,श्री.विठ्ठल दबडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक,फरासखाना,पुणे, श्री.चुडाप्पा,पोलिस निरिक्षक,गुन्हे,विश्रामबाग श्री.दादासाहेब गायकवाड, पोलिस निरिक्षक,गुन्हे, फरासखाना, पुणे,श्री.मंगेश जगताप तसेच विशेष शाखा व पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी व पोलिस अमंलदार यांचे उपस्थितीत पार पडली.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलिस निरीक्षक, खडक पोलिस स्टेशन,श्री.सुनिल माने यांनी केले.


Aug 10, 2023, 18:53


Aug 10, 2023, 20:43